# महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगांव 425002

ईमेल.gacjalgaon@gmail.com 0257-2996423

जा.क्र.शाआमज/भांडार/पाईपलाईन/23-24/2023/ 1909 दिनांक- 22 MAY 2023

प्रति,

-------------

-------------

---------------

विषय :- महाविद्यालयातील विभागात पाईपलाईन करणे तसेच इतर अनुषंगीक कामे करण्याकरीता स्थानिक बाजारपेठेतील पुरवठादारांकडुन दरपत्रके मागविण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव येथे ०४ विभागात पाईपलाईन करुन पाण्याची व्यवस्था करणेसाठी खालील नमुद तपशिलाप्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहुन इच्छुक व पात्र पुरवठादाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पाईपलाईन करिता लागणारे आवश्यक साहित्य | प्रतिनग किंमत सर्व करांसहीत | आवश्यक नगसंख्या | एकूण किंमत सर्व करांसहीत |
|---|---|---|---|---|
| १. | साहित्याचे नांव | | | |
| २. | Labour Charge (पाईप प्रति फुट -------- रुपये)<br>(प्रत्यक्ष कामाची पाहणी करुन दर आकारण्यात यावे.) | | | |

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि. २२.०५.२०२३ ते दि. ३०.०५.२०२३. |
| २ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दि.०१.०६.२०२३. |
| ३ | दरत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता ,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय जळगांव.<br>श्री.गुलाबराव देवकर अभियांत्रीकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगांव. |

## अटी व शर्ती

१. दिनांक ३०.०५.२०२३ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रकाच्या पाकीटावर Quotation for Pipe Line Work असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. सदरपत्रक सादर करण्यापुर्वी पुरवठादाराने महाविद्यालयात प्रत्यक्ष येऊन कामाची पाहणी करावी व पाहणीअंती त्यानुसार लागणारे आवश्यक साहित्य व कामाची मजुरी नमुद करुन आपले दरपत्रक सादर करावे.

४. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये. दरपत्रकामध्ये आवश्यक तेथे दिनांक व ठिकाण नमुद करावे.

५. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सुचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

६. दरपत्रक सादर करणाया अन्य संस्थेमध्ये थेट-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-स्वारस्य असू नयेयाकरीता सोबत जोडण्यात .तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील , आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. **(हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)**

७. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे दरपत्रक सादर केलेल्या . दरपत्रक धारकांचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्षतरे .अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा/ आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

८. दरपत्रकासोबत GST **नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व शॉप ॲक्ट परवाना नुतनी करणासहीत साक्षांकित झॅरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक राहील.**

९. देयकाच्या रकमेतुन शासन नियमातील तरतुदीनुसार GST/ Income Tax कपात करण्यात येईल. सदर टॅक्स मधुन सुट अनुज्ञेय असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

१०. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

११. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

१२. शा.निर्णन उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्यावर अनियमितता /गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. यशस्वी दरपत्रक धारकासपुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर जास्तीत जास्त सात दिवसामध्ये कामाला सुरवात करावी लागेल तसेच सदर कामाकरीता वापरण्यात येणारे साहित्य उत्तम दर्जाचे असावे.

१४. आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रद्द केलेला धनादेश इ. देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१५. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्दकरणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

१६. यशस्वी दरपत्रक धारकास वस्तुंचा पुरवठा स्व:खर्चाने या संस्थेपर्यत करावा लागेल तसेच वस्तु मध्ये तुटफुट किंवा गहाळ झाल्यास वस्तुंचा स्विकार केल्या जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

१७. या कार्यालयाचे दरपत्रक सुचनेमध्ये दिलेल्या यादीतील तपशीलाप्रमाणे दरपत्रक सादर करणे अनिवार्य आहे.

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्याल, जळगांव.

दरपत्रकासोबत जोडावयाचे कागदपत्रे

१) GST नोंदणी प्रमाणपत्र.
२) पॅन कार्ड
३) शॉप ॲक्ट परवाना किंवा ड्रग्स परवाना नुतनीकरणासह
४) हमीपत्र -१ व हमीपत्र -२
५) Annexure -B

## Annexure - B

प्रति ,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा करसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्तामेल आयडीसहित-दुरध्ववी ई, | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | GST No. | |
| ५ | PAN No. | |
| ६ | शासनाचे इतर कर/ | |
| ७ | सदर वस्तुंचा पुरवठा इतर शासकीयनिमशासकीय / कार्यालयास केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत .दुरध्वनी क्र | |
| ८ | हमी पत्र | |
| ९ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

## हमीपत्र -१ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

मी,............................ लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव येथील पाईपलाईनचे कामे करण्याकरीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

..........................................................................................................................................

## हमीपत्र-२ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

मी ...............................लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव येथील पाईपलाईनचे कामे करण्याकरीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित